# प्रेसनोट दि.०२/०५/२०१७

## पोलीस मुख्यालय शिवाजीनगर येथील नुतन हिरकणी बहुउद्देशीय संकुल पाळणाघर व जीमचे उद्‌घाटन समारंभ

आज दि.०२/०५/२०१७ रोजी सायंकाळी १७/०० वा. मा.पोलीस आयुक्त,श्रीमती.रश्मि शुक्ला यांचे संकल्पनेतुन व पोलीस कल्याण निधीतुन पुणे शहर पोलीस दलाचे वतीने पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर,पुणे याठिकाणी नव्याने बांधण्यात आलेल्या **नुतन हिरकणी बहुउद्देशीय संकुलाचे** उद्‌घाटन मा.श्री. सतिश माथुर,(भापोसे),पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे शुभहस्ते झाले. त्यावेळी मा.रश्मि शुक्ला,पोलीस आयुक्त,पुणे शहर, मा.रविंद्र कदम,सह पोलीस आयुक्त,पुणे शहर, मा.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे व पोलीस आयुक्तालयातील तसेच परिमंडळातील पोलीस उप-आयुक्त दर्जाचे सर्व अधिकारी उपस्थित होते. त्याचप्रमाणे पुणे शहर व परिसरातील इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी हजर होते.

नव्याने बांधण्यात आलेल्या **हिरकणी संकुल** हे तळमजला अधिक चार मजल्याचे असुन त्यापैकी दोन मजले तयार आहेत. त्यापैकी तळमजल्यावर उजवे हाताला पोलीसांना व त्यांचे कुटुंबियांना सुलभतेने शॉपिंग करता यावी यासाठी प्रशस्त पोलीस सबसिडीरी कॅन्टीन चालु केली आहे. संकुलाचे डावे हाताला नव्या स्वरूपात पोलीस मेस असुन,त्यामध्ये नवप्रविष्ठ पोलीस व कोर्ससाठी आलेले असे १०० ते १५० पोलीस एकाच वेळेस जेवण करू शकतील. पहिल्या मजल्यावरील डावे हाताला व्याख्यानासाठी रूम असुन,त्याठिकाणी नवप्रविष्ठ पोलीस व महिला यांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. उजवे हाताला पोलीस लायब्ररी मध्ये विविध प्रकारची साहित्यीक व उपयुक्त अशी वाचनीय पुस्तके असुन अभ्यास करण्यासाठी मुबलक जागा आहे. दुस-या मजल्यावर नवप्रविष्ठ महिला पोलीसांना राहण्यासाठी दोन्ही बाजुला २० बाय २० बंकबेड (डबल) लावण्यात आलेले आहे. तसेच पोलीस कर्मचा-यांचे लहान मुलांकरीता पाळणाघर,त्याचप्रमाणे पोलीसांकरीता अद्यावत अशी जीम उभारण्यात आलेली आहे.

नव्याने बांधण्यात आलेल्या हिरकणी संकुलासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी श्री.बावीस्कर,कार्यकारी अभियंता, श्री.डोंगरे,उपविभागीय अभियंता तसेच श्री.नाईक,कनिष्ठ अभियंता या सर्वांनी मोलाचे सहकार्य केले आहे.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.सुधीर गाडगीळ यांनी केले. त्यानंतर आभार प्रदर्शन पोलीस उप आयुक्त,गुन्हे,श्री.पी.आर.पाटील यांनी केले.


आयुक्त कार्यालय,पुणे शहर
व्यायामशाळा
उद्घाटन समारंभ
श्रीमती रश्मि शुक्ला
पोलीस आयुक्त, पुणे शहर
सुनिल रामानंद
सह आयुक्त, पुणे शहर
यांचे उपस्थितीत
समस्त पोलीस अधिकारी व कर्मचारी वृंद,पुणे शहर


पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
हिरकणी बहुउद्देशीय संकुल
मा.श्री.सतिश माथुर





